## अमरावती महानगरपालिका, अमरावती

दिनांक २०/०३/२०२५ रोजी प्राप्त व

दिनांक २४/०३/२०२५ रोजीचे सर्वसाधारण सभेचे वेळेवर मंजुर करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा

विषय क्रमांक २२१ – नविन प्रशासकीय इमारत उभारण्याकरीता समिती गठीत करण्याबाबत.

ठराव क्रमांक २२१ – मा. श्री रवि राणा, विधानसभा सदस्य यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र यांना अमरावती महानगरपालिकेची आहे. त्याच ठिकाणी नव्याने अत्याधुनिक व सुसज्ज इमारत बांधकामास मंजुरी मिळणेकरीता दि. ०५/०२/२०२५ रोजीचे पत्र ज्यावर मा. मुख्यमंत्री यांनी प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना दिलेले पत्र प्राप्त झाले आहे. तसेच मा. राज्य सभा सदस्य श्री अनिल बोंडे व मा. सौ. सुलभाताई खोडके विधानसभा सदस्य यांनी मनपा प्रशासकिय इमारत बांधकामा संदर्भात पत्र दिलेले आहे.

अमरावती महानगरपालिकेची प्रशासकिय इमारत ही शहराच्या अगदी केंद्रं स्थानी आहे. या जागेचे एकुण क्षेत्रफळ ६७०६ ची.मी. आहे. या जागेवर सर्वप्रथम स्वातंत्र्यापुर्वी इंग्रज कालीन कचेरी कार्यालय (दगडी) आहे.त्यानंतर शहराच्या विकासानुसार नगरपालिका व महानगरपालिका (सन १९८३) बदल होवुन आवश्यकतेनुसार टप्याटप्याने इमारतीचे बांधकाम झालेले आहे. या इमारतीचे वय अंदाजे ३० ते ४० वर्षे आहे. ही जागा शहराच्या मध्य भागी बाजारपेठेत असल्याने परिस्थितीनुसार जागेच्या तिन्ही बाजुने खाली मनपा मार्केट असुन त्यावर मनपाचे काही प्रशासकिय विभाग आहेत. इमारतींची नियमीत दुरुस्ती व रखरखाव ठेवण्यात आलेले नाही. कार्यालय दाट व्यापारी क्षेत्रात असल्याने तसेच नागरीकांची कामकाजासाठी कार्यालयात गर्दी व यासाठी पार्किंग व त्याप्रमाणे सुखसुविधेचा अभाग या सर्व बाबींचा विचार करुन यापुर्वीच सन 2016-17 मध्ये नव्याने प्रशस्त मनपा प्रशासकिय कार्यालय उभारण्याची कार्यवाही करण्यात आली होती परंतु जागेअभावी (विद्यापीठ रोड वरील प्रस्तावित जागा) ते शक्य झाले नाही.

मा. आमदार यांच्या मागणी नुसार नव्याने याठिकाणी मनपा प्रशासकिय इमारत करावयाची झाल्यास सर्व प्रथम यासाठी तज्ञ आर्किटेक्ट यांच्या कडुन Plan, Drawing & Design मागविण्यासाठी ई-निवीदा बोलविणे योग्य होईल. तसेच प्रशासकिय इमारतीसाठी या जागेवर उपलब्ध होणारे F.S.I., अनुज्ञेय बाबी, मनपातील वेगवेगळया विभागाची संरचना त्याचप्रमाणे आवश्यक असणाऱ्या इतर बाबी, याकरीता सर्वसमावेशक सुसज्ज व आधुनिक प्रशासकिय इमारत करीता समिती गठीत करणे योग्य राहील. समितीचे अध्यक्ष मा. आयुक्त राहतील तसेच इतर सदस्य खालीलप्रमाणे राहतील अशी मान्यता मा. आयुक्त यांनी प्रदान केलेली आहे.

| अ.क्र. | अधिकारी | पद |
|---|---|---|
| 1 | मा. आयुक्त, मनपा अमरावती | अध्यक्ष |
| 2 | शहर अभियंता, मनपा अमरावती | सदस्य सचिव |
| 3 | अधिक्षक अभियंता, सा.बां. विभाग, अमरावती | सदस्य |
| 4 | कार्यकारी अभियंता (विद्युत), सा.बां. विभाग, अमरावती. | सदस्य |
| 5 | सहा. संचालक नगर रचना, मनपा, अमरावती | सदस्य |
| 6 | मुख्यलेखा अधिकारी | सदस्य |
| 7 | विधी अधिकारी, मनपा अमरावती. | सदस्य |
| 8 | अधिक्षक, बाजार व परवाना, मनपा, अमरावती. | सदस्य |

उपरोक्त प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास तसेच गठित समितीस मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

स्वा./-
नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती

स्वा./-
प्रशासक
महानगरपालिका,अमरावती

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.